वर्ष तेरावे : अंक १४
: फेब्रुवारी २०२५ :




# कॉक्लिआ वार्ता

मुकं करोति वाचालं...

COCHLEA - PUNE
कॉक्लिआ पुणे
श्रवण आणि वाचा विकासासाठी
FOR HEARING & SPEECH

◆ 1998 ◆

# COCHLEA WARTA








वार्षिक स्नेहसंमेलन
२०२४-२५

Volume Thirteen : Issue 14 : FEBRUARY 2025 Total Pages : 16 Rs. 10/-

# वार्षिक स्नेहसंमेलन २०२४














COCHLEA WARTA कॉक्लिआ वार्ता

वर्ष : १३ वे | अंक : १४

**संपादक**
डॉ. अविनाश वाचासुंदर

**कार्यकारी संपादक**
सौ. मानसी दाते

**कार्यकारी मंडळ**
मृदुल हेमंत बापट

**मुद्रण :**
व्यंकटेश प्रिंटर्स, पुणे.

**मुखपृष्ठ व सजावट :**
सौ. मानसी दाते

## अंतरंग

**Editorial** ... ०२
Mrs. Manasee Date

**वार्षिक स्नेहसंमेलन** ... ०३
– मृदुल बापट

**गगनाला पंख नवे...** ... ०५
– मृदुल बापट

**कुटुंबाचा सहभाग हीच माझी ताकद** ... ०६
– राधिका ताम्हणकर

**Event** ... १०
– तृप्ती कोहिनकर

| | | |
|---|---|---|
| **Printed & Published by** | : | Cochlea Pune for Hearing and Speech |
| **Owned by** | : | Cochlea Pune for Hearing and Speech |
| **Printed by** | : | Sanjeev V. Shinde<br>Paud Road, Kothrud, Pune. |
| **Published at** | : | Cochlea Pune for Hearing and Speech<br>161-A, Modibaug, Shivsagar Society,<br>Near Mhasoba Gate, Shivajinagar, Pune 411 016. |
| **Editor** | : | Dr. Avinash Madhav Wachasundar |

# EDITORIAL

**- Mrs. Manasee Date**

The Celebration of 'Annual Day' is still lingering in the hearts of all those who attended, as well as the teachers and the parents.

Wow..! what with the fantastic performances of the hearing impaired kids. There were dances, Dramas, Shloka recitation and what not...

Our chief guest the well-known marathi actor Shri Sunil Barve watched the full program with tears in his eyes. He was moved by the efforts of the teachers and children.

Mr. Hemant Watve, Dr. P.V.S. Shastri and Pandit Atulkumar Upadhye all of them were impressed with the creativity of the teachers.

The theme for this year is 'Six - 'स' S' स्वीकार, सहभाग, संकल्प, संवाद, सहवास, सातत्य.... That is acceptance, Participation, Commitment, Communication, Companionship and Continuity.

Archana Bhide has given her experience of all these Six - 'स' in her write up.

Mrudul Bapat has given all the details of the 'Annual Gathering' and Trupti Kohinkar has put up the events of the month.

Our new recruit Radhika has written about her journey from Silence to Speech. It is really inspiring.

There is no doubt that the children who pass out from 'Swarnaad' will shine in future.

By following all these 'Six - स', the teachers and parents leave no stone unturned for the development of these kids.

The confidence of the teachers and parents percolate to the hearing impaired children and in this 'Annual Gathering' every one noticed the confidence with which these children were performing.

Three cheers to all the 'Cochlea Team' and parents.

◆◆◆

## वार्षिक स्नेहसंमेलन

कॉक्लिआ पुणे संचलित 'स्वरनाद' – कर्णबधिर बालकांच्या पुनर्वसन केंद्राचे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक २२ डिसेंबर २०२४ रोजी पं. भीमसेन जोशी कलामंदीर, औंध येथे दिमाखात पार पडले.

दरवर्षी स्नेहसंमेलन कोणत्या ना कोणत्या विषयाला अनुसरुन बेतलेले असते. यावर्षी '६–स' म्हणजेच स्वीकार, संवाद, संकल्प, सहवास, सहभाग, सातत्य. या संकल्पनांवर आधारित होते या संकल्पनांवर आधारित मुलांचे नृत्य, नाटिका, नाट्कले बसवले होते. संस्थेच्या नारायणगांव, मंचर, खेड, चिंचवड, पिंपरी, कोथरुड तसेच उरवडे येथील निवासी केंद्रातील सर्व मुलांचे मिळून हे वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात पार पडले.

वार्षिक स्नेहसंमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध अभिनेते श्री. सुनील बर्वे लाभले होते. सुनीलजी, स्वतः मराठी चित्रपटसृष्टी आणि मराठी नाट्यसृष्टीचे अभिनेते आहेत. त्यांनी 'सुबक' नावाने निर्मिती संस्था काढली असून 'हर्बेरियम' नावाचा एक प्रकल्प सुरु केला. या प्रकल्पांतर्गत पाच जुन्या नाटकांची पुननिर्मिती करण्याचा त्यांचा मानस आहे. त्यातील सूर्याची पिल्ले हे पहिले पुननिर्मित नाटक सध्या नाट्यगृहांमध्ये यशस्वीपणे सुरु आहे.

दुसरे पाहुणे श्री. हेमंत वाटवे हे होते विलोमॅथर ॲण्ड प्लॅट पंप प्रा. लि. या जर्मन कंपनीचे ते चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक आहेत.

वरील दोन्ही पाहुण्यांचे स्वागत व सन्मान अनुक्रमे कॉक्लिआ संस्थेचे अध्यक्ष श्री. दत्तात्रेय चितळे आणि व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. अविनाश वाचासुंदर यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच डॉ. पी.व्ही.एस. शास्त्री हे महर्षि कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे सचिव स्नेहसंमेलनाला पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांचे स्वागत व सन्मान सौ. रक्षा देशपांडे यांच्या हस्ते झाला.

खरे तर स्नेहसंमेलनाचा दिवस म्हणजे सोन्याचा दिवस ठरला, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण, या दिवशी साहित्य – संगीत क्षेत्रातील नावाजलेल्या दोन व्यक्ती आम्हाला लाभल्या होत्या. सुनील बर्वे आणि पंडीत अतुलकुमार उपाध्ये पंडीतजी प्रसिद्ध व्हायोलीन वादक आहेत. त्यांनी व्हायोलीन वादन विद्यालय सुरु केले. त्यांचे स्वागत व सन्मान संस्थेच्या शिक्षण संचालिका सौ. रक्षा देशपांडे यांनी केले.

दीपप्रज्ज्वलन झाल्यावर मान्यवरांचे स्वागत, परिचय व सन्मान झाले. त्यानंतर प्रत्यक्ष कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावर्षीच्या प्रत्येक कार्यक्रमामध्ये '६–स' शी संबंधित उल्लेख आणि प्रत्यक्ष घरातील – बाहेरील क्षण उभारलेले होते. लहान मोठ्या सर्वच मुलांनी खूप सुंदर नाटके तयार केली होती.

नृत्यासाठीसुद्धा संवाद, स्वीकार, संकल्प, सहभाग अशा संकल्पनांवर आधारित गाण्यांवर नृत्य बसवण्यात आली होती.

सर्व मान्यवरांना संपूर्ण कार्यक्रम अतिशय भावला. यावर्षी विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. तसेच १० वी – १२ वी च्या परिक्षेत यशस्वी झालेल्या सर्वच मुलांना बक्षिसे देण्यात आली.

आदर्श आई, आदर्श विद्यार्थी व आदर्श पालक तसेच सर्वांत महत्त्वाचा आदर्श शिक्षिका हे पुरस्कार या स्नेहसंमेलनात देण्यात आले.

कॉक्लिआ वार्ताच्या वार्षिक अंकाचे प्रकाशन संस्थेचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. अविनाश वाचासुंदर, शिक्षण संचालिका सौ. रक्षा देशपांडे, हितचिंतक श्री विनय देशपांडे व सौ. मानसी दाते आणि माजी मुख्याध्यापिका अभिलाषा अग्निहोत्री यांच्या हस्ते झाले.

स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात संपन्न झाले.

**मृदुल बापट**
समुपदेशक आणि समाजकार्यकर्ती
स्वरनाद, कोथरूड

◆◆◆

## पुरस्कार प्राप्त व्यक्तींची नावे

| | | |
|---|---|---|
| **विशेष प्राविण्य** | : | अनन्या रानपुरा, अर्णव साळुंखे, पूनम खंडारे |
| **आदर्श पालक** | : | भारती परमार (आर्वीची आत्या) |
| **आदर्श पिता** | : | दिलीपकुमार साबळे |
| **आदर्श विद्यार्थी** | : | आरव दराडे, श्रेया बंडगर (उरवडे) |
| **आदर्श पालक** | : | जया बंडगर |
| **आदर्श शिक्षिका** | : | रूक्मिणी बाठे, दिपाली साळुंखे |




# गगनाला पंख नवे...

## पुरस्कार सोहळा २०२४

आपल्या दिव्यांगत्त्वावर मात करुन स्वतःचं व्यक्तिमत्त्व घडवणाऱ्या व्यक्तींचा आणि समाजातल्या विशेष मुलांसाठी त्यांचा भक्कम आधार बनलेल्या संस्थांना मिती ग्रुप तर्फे उत्तरा मोने यांच्या पुढाकाराने दरवर्षी 'गगनाला पंख नवे...' पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते.

यावर्षी या पुरस्काराचे १० वे वर्ष होते. मिती ग्रुपने यावर्षीपासून डॉ. स्नेहलता देशमुख स्मृती पुरस्कार जाहिर केला आणि हा पुरस्कार प्रथम कॉक्लिआ पुणे फॉर हिअरिंग ॲण्ड स्पीच या आपल्या संस्थेला देण्यात आला. सन्मानपत्र आणि आर्थिक मदत असे या पुरस्काराचे स्वरुप होते.

पुरस्कार सोहळा दिनांक २५ डिसेंबर २०२४ रोजी दादर, मुंबई येथील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक सभागृहात आयोजित करण्यात आला होता. हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी संस्थेतर्फे शिक्षण संचालिका सौ. रक्षा देशपांडे मॅडम, माजी मुख्याध्यापिका अभिलाषा अग्निहोत्री तसेच मुख्याध्यापिका मृदुला देवळाणकर, आणि इतर विशेष शिक्षिका उपस्थित होत्या. वैयक्तिक पुरस्कार तीन दिव्यांग व्यक्तींना मिळाले. त्यात एक व्यक्ती स्वमग्नता असणारी होती. दुसरा पुरस्कार एका दृष्टीहिन बुद्धीबळपटुला मिळाला तर तिसरा पुरस्कार पायामध्ये व्यंग असणाऱ्या पण सलग दोन वर्षे सरपंचपद भूषवलेल्या दिव्यांग महिलेला मिळाला. तसेच चार संस्थांना पुरस्कार मिळाले.

कॉक्लिआ पुणे स्वरनादला मिळालेला हा अतिशय महत्त्वाचा पुरस्कार आहे. त्याबद्दल संस्थेला उपस्थित मान्यवर मृणाल कुलकर्णी (प्रसिद्ध अभिनेत्री) यांनी शुभेच्छा दिल्या. डॉ.संजय दुधाट, श्री. उदय देशपांडे (गुरु मल्लखांब) आणि दूरदर्शन निवेदिका मंजिरी मराठे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आलाध या पुरस्काराचे संपूर्ण श्रेय संस्थेच्या सर्व विशेष शिक्षिकांना जाते, असे शिक्षण संचालिका रक्षा देशपांडे यांनी आवर्जून सांगितले. यानिमित्ताने संस्थेची प्रचार–प्रसिद्धी चांगली झाली. कर्णबधिरत्वाबाबतची जनजागृती करण्याची मोठी संधी लाभली.

**मृदुल बापट**
समुपदेशक आणि समाजकार्यकर्ती, स्वरनाद, कोथरूड

◆◆◆

## कुटुंबाचा सहभाग हीच माझी ताकद..

मी जन्माला आले तेव्हा माझ्या पालकांना खूप आनंद झाला होता. सगळं कसं छान वाटत होतं, परिपूर्ण वाटत होतं. पण जसजसे महिने उलटत गेले तसतसे त्यांना काहीतरी वेगळे घडतंय असे वाटू लागले. मी सुमारे चार महिन्यांची असताना त्यांना शंका येऊ लागली की, मी ऐकू शकत नाही. त्यांनी सांगलीतील स्थानिक डॉक्टरांचा सल्ला घेतला. डॉक्टरांनी अधिक सखोल मूल्यांकनासाठी मुंबईतील तज्ञांना भेटण्याची शिफारस केली. मोठ्या आशेने आम्ही मुंबईला गेलो, जिथे सुरुवातीच्या अहवालात असे म्हटले होते की मी सामान्यपणे ऐकू शकते. माझे पालक निश्चिंत झाले किमान काही काळासाठी तरी.... काही महिन्यानंतर माझे वडील सांगलीतील त्याच डॉक्टरांना भेटले आणि त्यांनी मुंबईतला रिपोर्ट अभिमानाने सांगितला तथापि डॉक्टरांना तो रिपोर्ट पटला नाही. मला ऐकण्याच्या समस्या आहेत यावर त्यांचा ठाम विश्वास होता आणि त्यांनी सांगलीमध्येच बेरा चाचणी करण्याचा सल्ला दिला. या चाचणीने खरेच सत्य उघड केले. मला ९० टक्के कर्णबधिरत्व आहे, असे कळले. माझ्या पालकांना ही जीवन बदलणारी बातमी मिळाली तेव्हा मी फक्त एक वर्षांची होते. त्यांच्यासाठी हा मोठा धक्का होता, पण धक्का असूनही माझ्या पालकांनी वेळ वाया घालवला नाही. पुढे जाण्याचा सर्वोत्तम मार्ग कोणता आहे, याबद्दल तज्ञांकडून सल्ला घेण्यासाठी ते परत मुंबईला गेले. तिथल्या डॉक्टरांनी बी टी ई श्रवण यंत्राची शिफारस केली आणि माझ्या पालकांना महत्त्वाचे मार्गदर्शन केले ते म्हणजे मुली बरोबरचा संवाद चांगला करण्यासाठी तिला कोणतीही एक भाषा शिकवण्यावर लक्ष केंद्रित करा.

मला कोणती भाषा शिकवायची हे निवडणे हा सोपा निर्णय नव्हता. माझ्या कुटुंबाकडे तीन पर्याय होते, मराठी, गुजराती किंवा इंग्रजी. आमची मातृभाषा गुजराती आहे, त्यामुळे तिचे महत्त्व खूप होते. तिला खोलवर सांस्कृतिक आणि भावनिक महत्त्वसुद्धा होते तथापि माझ्या पालकांनी शेवटी मराठी ही भाषा निवडली. कारण मराठी मला सर्वसामान्य व्यक्ती सारखे आयुष्य जगायला खूप चांगल्या संधी देईल, असा विश्वास होता. त्या क्षणापासून कुटुंबातील प्रत्येकाने आजी, आजोबा, चुलत भाऊ आणि अगदी इतर नातेवाईकांनी माझ्याशी मराठीत बोलण्यासाठी स्वतःला वाहून घेतले होते. त्यांच्या समूहिक प्रयत्नांनी माझ्या भविष्याचा पाया रचला गेला.

माझ्या आयुष्यातील सर्वात मोठ्या आशीर्वादांपैकी एक म्हणजे श्रीमती नीला जहागीरदार या माझ्या वाचा–भाषा प्रशिक्षक होत्या. श्रवणदोष असलेल्या मुलांना शिक्षण देण्यात विशेषज्ञ असलेल्या त्या केवळ माझ्यासाठीच नव्हे तर माझ्या पालकांसाठीही मार्गदर्शक बनल्या. माझे वडील मला दररोज त्यांच्या घरी घेऊन जात असत. जिथे त्या माझ्या वाचा–भाषा विकासाला आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी धीराने शिकवत असत. त्यांनी माझ्या पालकांना श्रवणदोष असलेल्या मुलांच्या कुटुंबांसाठी असलेल्या प्रशिक्षण

वर्गांमध्ये देखील प्रवेश घेऊन दिला, ज्यामुळे माझ्या पालकांना मला प्रभावीपणे कसा आधार द्यायचा हे शिकण्यास मदत झाली.

श्रीमती जहागीरदार यांचा आग्रह होता की, मी विशेष शाळे ऐवजी सर्वसामान्य शाळेत जावे.. त्यांचा असा विश्वास होता की, मुख्य प्रवाहातील वातावरणात राहिल्याने माझा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल. यासाठी माझ्या पालकांनी अगदी नेटाने अतिरिक्त प्रयत्न केले. नीला मॅडम यांनी एक नवीन दिनचर्या तयार करून दिली. या नवीन दिनचर्येशी जुळवून घेणे आव्हानात्मक होते. सुरुवतीला मी माझे श्रवणयंत्र घालण्यास विरोध केला. अनेकदा वैतागून ते फेकून दिले, पण तरी माझ्या पालकांनी, शिक्षकांनी कधीही वैतागून प्रयत्न सोडले नाही. कालांतराने मला मशीन लावण्याचे महत्त्व कळले आणि मी ते सातत्याने घालू लागले.

मला मराठी शिकण्यास मदत करण्यासाठी शिक्षकांनी एक नाविन्यपूर्ण पद्धत सुरू केली. दर आठवड्याला पाच नवीन शब्द... माझ्या पालकांनी आमच्या घरातील भिंतींवर या शब्दांची चित्रे लावली, ज्यामुळे शिक्षण एक मजेदार आणि परस्पर संवादी प्रक्रियेमध्ये बदलत गेले. उदाहरणार्थ मला बॉल म्हणजे काय हे शिकवताना त्यांनी त्याची वैशिष्ट्ये वर्णन केली. मला एक खरा खरा बॉल प्रत्यक्ष दाखवला आणि त्याचवेळी मला त्याचे चित्र शोधून दाखवण्यास सांगितले. कुटुंबातील प्रत्येकाने या अशा खेळांमध्ये प्रत्यक्ष सहभाग घेतला, त्यामुळे माझ्या कुटुंबातील इतर सदस्यांबरोबर माझे नातेसंबंध अधिकच दृढ होत गेले.

गणित शिकत असताना अशाच सर्जनशील तंत्राचा समावेश होता. मूलभूत संकल्पना स्पष्ट करण्यासाठी माझ्या पालकांनी घरातील भांडी, दैनंदिन वस्तूंचा समावेश केला. उदाहरणार्थ आई मला चार चमचे द्यायची त्यातील दोन ती स्वतःकडे घ्यायची आणि विचारायची किती राहिले तुझ्याकडे? अशा प्रकारे वाजाबाकी सहजतेने समजण्यास मला मदत करायची. या व्यावहारिक पद्धतीमुळे गणित शिकणे आनंददायी आणि प्रभावी बनत होते.

माझ्या कुटुंबाच्या पाठिंब्याशिवाय मी कधीच बोलू शकले नसते. बोलायला शिकणे जितके महत्त्वाचे होते तितकेच आर्थिक पाठबळही महत्त्वाचे होते. पुरेशा निधी शिवाय यापैकी काहीही शक्य झाले नसते. श्रवणी यंत्र देखील खूप महाग होती. अमेरिकेत राहणारी माझी आत्या छाया शाह हिने अमूल्य आर्थिक मदत केली. तिच्या उदारतेमुळे आणि पाठिंब्यामुळे मी बी.टी.ई मशीन घेऊ शकले. ज्यामुळे मला श्रवण प्रशिक्षण घेता आले. माझी आत्या जिला दोन मुलगे आहेत तरी देखील तिने मला दत्तक घेऊन अमेरिकेत जाण्याची तयारी दाखवली होती. तथापि सांकेतिक भाषा ही तिथे संवादाचे प्राथमिक साधन असल्याने बोलायला शिकण्याच्या माझ्या क्षमतेला अडथळा निर्माण झाला असता त्यामुळे शेवटी मी माझ्या पालकांसोबतच भारतात राहिले. तरीही

माझ्या आत्याच्या अटळ पाठिंब्यामुळे मी आयुष्यात इतकी प्रगती करू शकले.

अखेर मी एका सर्वसामान्य शाळेत प्रवेश घेतला. शाळा सामाजिकीकरण आणि सामाजिक संवाद उवाढवण्यासाठी होती हे खरे परंतु, माझे बहुतेक शैक्षणिक शिक्षण घरीच कुटुंबामध्ये आणि स्पीच थेरपिस्ट यांच्याबरोबर झाले. शालेय जीवनाशी जोडून घेणे इतके सोपे नव्हते. माझ्यातील काही कमतरतामुळे मला अनेकदा आव्हानांचा सामना करावा लागला आणि शाळेकडून फारसा पाठिंबा मिळाला नाही. माझ्याबद्दल तक्रारी वारंवार येत होत्या आणि माझ्या पालकांनी मात्र त्या संयमाने हाताळल्या. या संघर्षांना न जुमानता मला समजून घेणाऱ्या काही मित्र–मैत्रिणींमुळे मला प्रेम, जिव्हाळा, समाधान मिळाले. माझी आई अनेकदा माझ्यासोबत उद्यानात यायची, माझ्या आणि माझ्या मित्र–मैत्रिणींमधील पूल म्हणून काम करायची. आमचे संवाद ऐकमेकांना समजावून सांगायची. सर्वसामान्य शाळा असून शाळेने माझ्यावर काही मर्यादा घातल्या होत्या. मला वार्षिक कार्यक्रमांमध्ये भाग घेण्याची परवानगी नव्हती परंतु माझ्या पालकांनी मला खेळात सहभागी होण्यास प्रोत्साहित केले. पुढील इयत्तेच्या अभ्यासक्रमाची तयारी करण्यासाठी उन्हाळी सुट्ट्यांचा खूप उपयोग केला. ज्यामुळे मी शैक्षणिक दृष्ट्या नेहमीच सर्वात पुढे राहिले. कालांतराने या प्रयत्नांना फळ मिळाले. मी माझे शालेय शिक्षण पूर्ण केले आणि अखेर संगणक या विषयामध्ये बॅचलर पदवी (BCA) मिळवली. कॉलेज माझ्या आयुष्यातील एक टर्निंग पॉईंट होता. माझे सामाजिकीकरण सोपे झाले आणि मला पाठिंबा देणारे मित्र–मैत्रिणी मिळाले. शिक्षकदेखील अधिक अनुकूल होते. मला शिकत असताना खूप मदत करत होते. दहावीनंतर वाणिज्य (कार्मस) विषय निवडणे हे शहाणपणाचेच ठरले, कारण ते माझ्याकडे असलेल्या इतर बळकट बाजूंबरोबर जुळले आणि भाषेशी संबंधित आव्हाने त्यामुळे कमी झाली. कॉलेजमध्ये असताना मी आत्मविश्वासू होते. ज्यामुळे मी या नवीन टप्प्यावर सहजतेने मार्गक्रमण करू शकले.

अतिरिक्त भाषा शिकणे म्हणजेच अजून एखादी भाषा शिकणे ही एक अनपेक्षित देणगी मला मिळाली. माझ्या धाकट्या भावाने जो माझ्यासोबत फक्त गुजराती भाषेत बोलत होता त्याने मला नैसर्गिकरित्या आमची मातृभाषा शिकण्यास फार मदत केली.माझ्या वडिलांनी मला माझ्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडण्यास प्रोत्साहित केले जसे की, स्वतःची कामे स्वतः करणे, अनोळखी लोकांशी बोलणे, ज्यामुळे माझ्या संवाद कौशल्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. यासाठी पालकांनी खूप प्रयत्न केले. माझ्या भावाने मला कधीच वेगळं मानलं नाही. समान संधी दिल्या, त्यामुळे मला कधीही कुटुंबातून वगळल्यासारखे वाटले नाही.

माझ्या कॉलेजच्या काळात मी अक्षयला भेटले, आमचे नाते खूप चांगले होते. एकमेकांशी जुळणारे होते. परंतु जेव्हा त्याने मला लग्ना संदर्भात विचारले तेव्हा मी खूप

संकोच व्यक्त केला. सुरुवातीला मी घाबरलेच होते कारण मला याची भीती होती की, माझ्या श्रवणदोषामुळे आमच्या भविष्यावर परिणाम होऊ शकतो. माझ्या अमेरिकेच्या भेटीदरम्यान मोठ्या चुलत भावाला विश्वासात घेऊन मी त्याच्याशी अक्षयबद्दल चर्चा केली. माझ्या भावाने अक्षय बरोबर देखील चर्चा केली. त्याला समजून घेण्यासाठी त्याच्याबरोबर संवाद साधला आणि त्यानंतरच माझ्या भावाने मला अक्षयचे प्रेम आणि समजूतदारपणा माझे जीवन समृद्ध करेल याबद्दल विश्वास दाखवला आणि माझ्या भावाचा विश्वास सार्थ ठरला. आता अक्षय मला प्रत्येक वेळी साथ देतो. माझ्या कुटुंबाच्या इतर सदस्यांमध्ये देखील मला सामावून घेतो. माझ्या घरच्यांनी देखील अक्षयची भेट घेतली आणि सगळ्यांनाच त्याच्याबद्दल खूप विश्वास वाटला. कुटुंबाच्या प्रोत्साहनामुळेच मला हा नवीन अध्याय स्वीकारण्याचे धाडस मिळाले आणि २०२१ मध्ये अक्षय आणि माझे लग्न झाले आणि एका सुंदर प्रवासाची सुरुवात झाली.

मागे वळून पाहताना माझं जीवन हे चिकाटी, कुटुंबाची ताकद आणि माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्यांच्या दयाळू मनाचे प्रतीक आहे, असे मला वाटते. माझ्या पालकांच्या अढळ पाठिंब्यापासून ते माझ्या शिक्षकांचे निस्वार्थ मार्गदर्शन, तसेच माझ्या आत्याची उदारता आणि माझ्या कुटुंबाचे आणि मित्रांचे प्रेम यांनी मला प्रत्येक आव्हान दृढनिश्चयाने पेलण्याचे मार्गदर्शन केले. आज मी किती पुढे आले आहे, याचा मला सार्थ अभिमान आहे. भविष्यात जे काही घडेल किंवा जे काही समोर येईल त्याला तोंड देण्यासाठी आता मी पूर्णपणे तयार आहे.

**राधिका ताम्हणकर**
डेटा एन्ट्री ऑपरेटर, स्वरनाद, कोथरूड

◆◆◆

**Your generosity can make a deaf child Speak**

Cochlea is registered under :
BPT 1950 Act.
Society Reg. Act.
PAN No. AAATC5056E

---

Account Name : 'Cochlea Pune for Hearing and Speech'
Account No. : 60040230428
Bank : Bank of Maharashtra
Branch : Shivajinagar, Pune.
IFSC Code : MAHB0000043

**All Donations are exempt under section 80G of the Income Tax Act.**

# EVENTS

- दिनांक २६ डिसेंबर रेजी कोथरुड आणि इतर केंद्रात नाताळचा सण साजरा करण्यात आला. त्यासाठीचा लेसन घेण्यात आला. शिक्षिका यांनी सांताक्लॉज बनून मुलांना खाऊ आणि भेटवस्तूचे वाटप केले. संस्थेच्या एका देणगीदार यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी जादूगार बोलवून जादूचे खेळ मुलांना दाखवले. मुलांनी मनमुराद आनंद लूटला.



- दिनांक १९ डिसेंबर ते २१ डिसेंबर या दरम्यान पुणे महानगरपालिकेतर्फे बालोत्सव आयोजित केला होता. त्यामध्ये संस्थेने दरवर्षीप्रमाणे सहभाग घेतला. संस्थेचा स्टॉलवर पपेट शो करण्यात आला. ३ दिवस या स्टॉलला भरपूर प्रतिसाद मिळाला. या निमित्ताने कर्णबधिरत्त्वाबद्दल जनजागृती करण्याची संधी मिळाली.




- दिनांक १० जानेवारी रोजी औंध येथील सिग्नल पार्क आणि अग्निशमन दलाला मुलांची भेट घडवून आणली. वाहने ही थिम शिकवताना वाहनांची माहिती मिळाल्यावर कोणकोणते नियम वाहन चालवतांना पाळावे लागतात यासाठी मुलांची भेट आयोजित केली होती. औंध येथे सिग्नल पार्क तयार केले आहे. तेथे छोट्या मॉडेल्सच्याद्वारे रस्ते, झेब्रा क्रॉसिंग, सिग्नल तयार केले आहेत. आणि तिथे सायकल घेऊन फेरी देखील मारता येते. जेणेकरून प्रत्यक्ष अनुभव घेता येतो.

त्याच जोडीने अग्निशमन दलाची भेट अग्निशामक गाडी काय काम करते याची माहिती व्हावी यासाठी आयोजित केली होती. मुलांना ही भेट अतिशय आवडली. यावेळी प्रत्यक्ष आग विझवण्याचे प्रात्यक्षिकही बघायला मिळाले.


- दिनांक १५ जानेवारी रोजी पुणे महानगरपालिका आयोजित दिव्यांगदिनानिमित्त कार्यक्रमामधे संस्थेचा स्टॉल लावण्यात आला होता. यामध्ये अनेक दिव्यांग व्यक्ती व दिव्यांगांसाठी काम करत असलेल्या संस्थांची ओळख व भेट झाली. जवळपास ३००० दिव्यांग व्यक्ती आणि २००० इतर व्यक्तींपर्यंत पोहोचण्याची संधी यामध्ये मिळाली. त्याचबरोबर या कार्यक्रमात संस्थेच्या शिक्षण संचालिका सौ. रक्षा देशपांडे मॅडम यांना दिव्यांगासाठी गेली २५ वर्ष करत असलेल्या उत्तम कार्याबद्दल व योगदानाबद्दल पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.
- दिनांक १७, १८ व १९ जानेवारी ला चिंचवड येथे पिंपरी-चिंचवड महानगर पालिका आणि दिव्यांग भवन यांच्या माध्यमातून दिव्यांगांसाठी पर्पल जल्लोष या महाउत्सवाचे आयोजन केले होते यामधेही आपल्या संस्थेला ३ दिवस स्टॉल लावता आला. तेथे जवळपास १००० लोकांनी प्रत्यक्ष भेट दिली. यामधे काही माजी विद्यार्थी व त्यांचे पालकही भेटले. दिव्यांगांसाठी काम करत असलेल्या अनेक संस्थांची ओळख झाली. संस्थेच्या शिक्षण संचालिका सौ. रक्षा देशपांडे मॅडम आणि मुख्य कार्यकारी विश्वस्थ डॉ. अविनाश वाचासुंदर सर यांचे व्याख्यानही या कार्यक्रमात झाले. सांस्कृतिक कार्यक्रमात संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनी उत्तम असे नाटक सादर केले आणि खूप कौतुक मिळवले. जवळपास ५०००-६००० लोकांपर्यंत या कार्यक्रमाच्या माध्यमातून संस्थेची माहिती व काम पोहोचवता आले.
- दिनांक २४ जानेवारी रोजी हिवाळ्याची थंडी अनुभवण्यासाठी टेकडीची भेट केली. सगळ्या मुलांना कोथरुड येथील हनुमान टेकडीवर फिरायला घेऊन गेलो होतो. खरोखर सगळ्या मुलांनी खूप मजा लुटली. टेकडीवर गेल्यावर मामाचे पत्र हा खेळ खेळलो.
- दिनांक २५ जानेवारी रोजी नाशिकच्या माई लेले कर्णबधिर विद्यार्थ्यांच्या शाळेच्या माजी मुख्याध्यापिका शिल्पा देशपांडे मॅडम आणि सक्षम-नाशिक चे काही पदाधिकारी यांच्यासमवेत २५ कर्णबधिर विद्यार्थ्यांच्या पालक-माता कोथरुड केंद्राला भेट देण्यासाठी आले होते. यावेळी त्यांना केंद्रातील सर्व उपक्रमांची माहिती दिली, शिक्षण संचालिका सौ. रक्षा देशपांडे मॅडम यांनी मार्गदर्शन केले व नंतर त्यांनी केंद्रातील पालकांशी संवाद साधला. स्वरनाद केंद्रात चालणारे पालक प्रशिक्षण नाशिकला सक्षम संस्था आणि कॉक्लिआ पुणे संस्था यांच्या माध्यमातून या २५ माता घेणार आहेत. सक्षम नाशिकचे सर्व पदाधिकारी यांच्या पुढाकाराने हा उपक्रम घडून आला आणि हे पालक प्रशिक्षण पुढे राबवले जाणार आहे.

**तृप्ती कोहिनकर**
समाजकार्यकर्ती, स्वरनाद, कोथरूड

◆◆◆

## वार्षिक स्नेहसंमेलन २०२४











## टेकडी भेट..







## पर्पल फेस्टिवलमध्ये सहभाग

## H.S.C. Result
## 2023-24

| Sr.No. | Name | Branch | Percentage |
|---|---|---|---|
| 1. | Aachal Mutha | Commerce | 89% |
| 2. | Om Sathe | Commerce | 66% |
| 3. | Mehek Belambe | Science | 51% |
| 4. | Aniket Bodke | Commerce | 47% |
| 5. | Sidhi Batwal | Commerce | 44.17% |

## S.S.C. Result
## 2023-24

| Sr.No. | Name | Percentage |
|---|---|---|
| 1. | Shravani Shinde | 85% |
| 2. | Prathmesh Halade | 70% |
| 3. | Soham Kedari | 67.60% |
| 4. | Arav Patil | 62.02% |
| 5. | Shrey Parbhane | 61% |
| 6. | Dhanaraj Jadhav | 60% |
| 7. | Shubham Batwal | 56% |
| 8. | Prathmesh Kumbhar | 51% |
| 9. | Sushma Dhotre | 50% |
| 10. | Anuj Nangare | 45% |

## SWARANAAD REHABILITATION CENTER
## Monthly Achievement - January 2025

| Sr. No. | FACILITIES | SESSION / STUDENT COUNT |
|---|---|---|
| 1. | Speech Therapy Sessions | 306 |
| 2. | No. of Student getting Speech Therapy | 108 |
| 3. | Aided Audiogram Testing | 19 |
| 4. | No. of Speech Assessment | 26 |
| 5. | No. of Counseling Sessions | 19 |
| 6. | Individual Occupation Therapy Sessions | 52 |
| 7. | No. of students getting Individual OT | 40 |
| 8. | Group Occupational Therapy Sessions | 23 |
| 9. | Psychological Assessment | 10 |
| 10. | Activity Therapies | 66 |

## SWARANAAD OUTREACH CENTER
## Monthly Achievement - January 2025

| Sr. No. | CENTERS | THERAPY SESSION |
|---|---|---|
| 1. | Khed | - - - |
| 2. | Narayangoan | 64 |
| 3. | Pimpari | 105 |
| 4. | Chinchwad | 64 |
| 5. | Phonda | 54 |
| 6. | Porvorim | 73 |
| 7. | Manchar | 106 |
| 8. | Daund | 25 |
| 9. | Urawade (Residential) | 68 |
| 10. | Kudal | 38 |

# होय! प्रत्येक कर्णबधिर मूल बोलेल..

## कॉक्लिआ पुणे फॉर हिअरिंग ॲण्ड स्पीच

### स्वरनाद कर्णबधिर बालकांचे पुनर्वसन केंद्र

## निवासी केंद्राची वैशिष्ट्ये

**प्रवेश चालू २०२४-२५**

१. २५ कर्णबधिर मुले आणि त्यांची माता यांची निवास व्यवस्था
२. दृश्य आणि क्रियाकलाब आधारित
३. शिक्षणावर विशेष भर देऊन पूर्व प्राथमिक शिक्षण
४. जवळपासच्या गावातील कर्णबधिर मुलांसाठी बालवाडी
५. भोजन व्यवस्था दालन – ५० जणांसाठी
६. लवकर निदान आणि हस्तक्षेप
७. बालक पालक कार्यक्रम
८. वाचा भाषा प्रशिक्षण (० ते ६) वयोगटातील मुले
९. नियमित वाचा भाषा विकास मूल्यांकन श्रवण तज्ज्ञांकडून श्रवण चाचणी
१०. पालक प्रशिक्षण कर्णबधिर मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांच्या मातांना सक्षम करणे.
११. विशेष शिक्षकांचे प्रशिक्षण

: संपर्कासाठी :

**9923289844 / 9822094940**

**HTTPS://COCHLEASWARANAAD.ORG/**

**पुसाळकर स्वरनाद माता बालक निवासी पुनर्वसन केंद्र**
**उरवडे, तालुका मुळशी, जि. पुणे.**

# संस्थेची केंद्र

**'स्वरनाद' कर्णबधिर बालकांचे बहुआयामी अपंग पुनर्वसन केंद्र**
बिंदू माधव ठाकरे दवाखाना,
गोसावी वस्ती समोर, हॅप्पी कॉलनी रोड,
कोथरूड, पुणे – ४११ ०३८.
**संपर्क : रक्षा देशपांडे ९९२३२८९८४४**
**अभिलाषा अग्निहोत्री ९३७१४२०९९४**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, चिंचवड**
मोरया मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल,
पिंपरी–चिंचवड लिंक रोड, पी.एम.टी.
शेवटच्या बसस्टॉप समोर, चिंचवडगाव,
पुणे – ४११ ०३३. **फोन : ९८२२६७१८४०**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, खेड**
डॉ. खडके गेस्ट हाऊस,
राजगुरुनगर बाजारपेठ, ता. खेड, पुणे.
**फोन : ९८५०७३८२७६**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, नारायणगाव**
डॉ. खैर जीवन मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल,
नारायणगाव जुन्नर रोड, पुणे.
फोन : ९७६६२६२३२७

**'स्वरनाद' कर्णबधिर बालकांची पूर्व प्राथमिक शाळा, पर्वरी–गोवा**
अनघा, प्लॉट नंबर १५, पी.डी.ए. कॉलनी,
पर्वरी बार्देश, गोवा – ४०३ ५२१.
**फोन : ९६२३७०१०२०**

**श्री शारदा ग्रंथ प्रसारक संस्था, सांचालित स्वरनाद कर्णबधिर मुलांसाठी पूर्व–प्राथमिक विद्यालय**
एफ–४, पहिला मजला, पै हाऊस सदन,
फौंडा, गोवा – ४०२ ४०१.
**फोन : ९६२३७०१०२०**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, पिंपरी**
वाय.सी.एम. हॉस्पिटल,
(पिंपरी–चिंचवड पालिकेच्या संयुक्त विद्यमाने) पिंपरी.
**फोन : ८०८७२२९९५४**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, दौंड**
शालीमार चौक, आनंद अपार्टमेंट,
'सी' विंग, फ्लॅट नं.२,
फॉरेस्ट ऑफिस समोर, ता. दौंड, पुणे.
**फोन : ७०४०६६८०७१/८६६८८३१२११**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, मंचर**
डॉ. तोडकर हॉस्पिटल, पिंपळगाव फाटा,
मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.
**फोन : ८४५९०१९६०२**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, कुडाळ**
लायन्स सेवा संकुल कुडाळ, अभिनवनगर,
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.
**फोन : ९४०५९९८९८९**

**'पुसाळकर स्वरनाद' माता बालक निवासी पुनर्वसन केंद्र**
माँटवर्ट विस्टा समोर, सर्वे नं. ४२५,
उरवडे, पिरंगुट, ता. मुळशी,
पुणे – ४१२ ११५.
**फोन : ८३०८८३२१४५**





टेकडी भेट...



औंधच्या अग्नीशामक केंद्रास भेट...










नाताळ आणि संक्रांत सण...





RNI No. : MAHBIL/2013/59067
SDM/PUNE/SR/21/2015
Registration No. : PCW/195/2023-25

Published and Posted on 10th FEBRUARY 2025
Posted at Model Colony PSO, Pune 411 016
on 10 of each month.

## पर्पल फेस्टिवलमध्ये सहभाग




## पुणे महानगरपालिकेतर्फे आयोजित बालोत्सव






पुणे महानगरपालिका
समाज विकास विभाग
जागतिक दिव्यांग दिन
सन २०२४-२०२५
गौरवपत्र
श्री./श्रीमती सौ. रक्षा देशपांडे
आपण दिव्यांग घटकांतर्गत सामाजिक / क्रिडा / शैक्षणिक / सांस्कृतिक / कला / व्यावसायिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कार्याबद्दल पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागामार्फत आपणास गौरविण्यात येत आहे. आपल्या पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!
नितीन उदास (उप आयुक्त)
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका
दिनांक : २७.१२.२०२४




Address :
To,